**प्रेसनोट** **दिनांक २७/०७/२०१९**

## बंडगार्डन पोलिस स्टेशन, पुणे शहर

## जुण्या भांडणाच्या कारणावरुन जबर दुखापत करून, पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीस बंडगार्डन पोलिसांनी केले जेरबंद

दिनांक २४/०७/२०१९ रोजी रात्रौ १०/०० वा.सुमारास ताडीवाला रोड भागात इसम नामे सुनिल शंकर सुर्यवंशी वय २९ यांस जुण्या भांडणाच्या कारणावरुन आरोपी नामे आतिश वानखेडे याने धारदार शस्त्राने डोक्यावर वार करुन गंभीर जखमी केले होते सदर बाबत बंडगार्डन पोलिस स्टेशन येथे सुनिल शंकर सुर्यवंशी यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी आतिश वानखेडे हा ताडीवाला रोड परिसरात असल्याची माहिती बंडगार्डन पोलिस स्टेशन कडिल तपास पथकातील पोलीस कर्मचारी गौरव उभे यांना मिळाली. त्याप्रमाणे पोलीस कर्मचारी गौरव उभे, सागर जगताप, व निखील जाधव हे आरोपीचा ताडीवाला भागात शोध घेत असताना, आरोपी पाच बिल्डींग भागात मिळून आल्याने त्यास लागलीच ताब्यात घेतले.

सदरची कारवाई ही बंडगार्डन पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुनिल तांबे व पोलिस निरिक्षक (गुन्हे) दिगबंर शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील कर्मचारी, गौरव उभे व सागर जगताप, निखील जाधव यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीसनिरीक्षक**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर**